# संत संताजी जगनाडे महाराज
## (दि.८ डिसेंबर,१६२४ ते इ.स.१६८८)
## (अल्प परिचय)

संत संताजी जगनाडे महाराज हे संत तुकारामांनी रचलेल्या अभंगांच्या संग्रहाचे लेखनिक होते. जगनाडे महाराज यांचा जन्म दि.८ डिसेंबर, १६२४ रोजी महाराष्ट्र राज्यात पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यातील सुदुंबरे या गावी विठोबा जगनाडे यांच्या घरी झाला. वडील विठोबा व आई माथाबाई हे विठ्ठल भक्त असल्याने संताजींवर बालपणापासूनच धार्मिक संस्कार झालेत. संताजींना बालपणापासूनच भजन कीर्तनाची आवड निर्माण झाल्यामुळे ते नंतर संत तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यांपैकी एक झालेत.

संत संताजी महाराजांचा वयाच्या १२ व्या वर्षी यमुनाबाई यांचेशी विवाह झाला. एकदा संत तुकाराम महाराज संताजींच्या गावी कीर्तनासाठी आले होते. संत तुकाराम महाराज यांच्या कीर्तनाचा मोठा प्रभाव संताजींवर असल्याने त्यांनी संसाराचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. संत तुकाराम महाराजांनी संसारात राहून परमार्थ साधता येतो, अशी संताजींची समजूत काढली आणि तेव्हापासून संताजी जगनाडे महाराज हे संत तुकाराम महाराजांच्या टाळकऱ्यांमध्ये सामील झाले.

संत तुकाराम महाराजांनी लिहिलेले अभंगांची गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवून नष्ट करण्यात आल्या. परंतु संत तुकाराम महाराजांचे सर्व अभंग हे संताजी महाराजांना मुखोद्गत असल्याने त्यांनी ते पुन्हा लिहून काढले. संताजींच्या अथक परिश्रमामुळेच संत तुकाराम महाराजांची अभंगाची गाथा जिवंत राहू शकली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या विचारांना जिवंत ठेवण्याचे महान कार्य संत संताजी जगनाडे महाराजांनी केले.

मार्गशिर्ष वद्य त्रयोदशी इ.स.१६८८ साली संताजी महाराजांनी देह ठेवला.

******

(स्त्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ)